**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणामार्फत फुटकळ भूखंडांचे वाटप करण्यापूर्वी शासनाची मान्यता घेण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## गृहनिर्माण विभाग

**शासन परिपत्रक क्रमांक : वाटप-२०१७/प्र.क्र.६५/गृनिभू,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ३० मे, २०१९

**वाचा:-** १) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, क्र.सुविधा-२०११/प्र.क्र.२४२/पुनर्बांधणी-३/गृनिभू, दि.०१.०४.२०१७,
२) शासन परिपत्रक, गृहनिर्माण विभाग, क्रमांक:वाटप-२०१७/प्र.क्र.६५/गृनिभू, दि.१४.०७.२०१७
३) शासन परिपत्रक, गृहनिर्माण विभाग, क्रमांक:वाटप-२०१७/प्र.क्र.६५/गृनिभू, दि.२३.०५.२०१८

**प्रस्तावना** :-

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम, १९८२ मधील विनिमय १६ अंतर्गत शासन स्तरावरुन, म्हाडाच्या निवासी/ अनिवासी भूखंडाच्या वितरणाकरीता शासनास प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करण्यासाठी मा.मंत्री, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची उप समिती शासन निर्णय, दि. १ एप्रिल, २०१७ अन्वये गठीत करण्यात आली आहे.

म्हाडाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या जुन्या वसाहतींमधील सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुनर्बांधणीसाठी विक्री करावयाचे उर्वरित चटईक्षेत्र, फुटकळ भूखंड, ना फुटकळ ना स्वतंत्रपणे विकास योग्य भूखंड, करमणूकीचे मैदान इत्यादींच्या वाटप व किंमतीचे सुधारित धोरण म्हाडा प्राधिकरणाचा ठराव क्र.६२६०, दि.४.६.२००७ अन्वये जाहीर केले आहे.

सदरहू ठरावानुसार याबाबतच्या भूखंडाचे वितरण करण्याचे अधिकार मंत्रिमंडळ उपसमितीस संदर्भाधीन दि.२३.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेले आहेत. उक्त दि.२३.५. २०१८ रोजीचा शासन निर्णय पारीत केल्यानंतर, राज्यातून म्हाडाच्या अभिन्यासातील फुटकळ भूखंड वितरीत करण्याचा एक प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये म्हाडाच्या अभिन्यासामधील मूळ भूखंडाचे क्षेत्र ४००० चौ.मी. पेक्षा मोठे असलेले अभिन्यास (Lay Out) फारच कमी आहेत. त्यामूळे शासनाकडे अशा प्रकारचे भूखंड मंजूरीला येण्याचे प्रमाणही अतिशय कमी आहे. त्यामूळे अशा स्वरुपाचे म्हाडा प्राधिकरणाकडून अतिशय कमी प्रमाणात प्राप्त होणारे प्रस्ताव असल्याने सदरचे प्रस्ताव मंत्रिमंडळ उप समितीसमोर ठेवण्याऐवजी शासन स्तरावरुनच मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिनियम, १९७६ च्या कलम १६४ मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या अभिन्यासातील मूळ भूखंडाचे क्षेत्र ४००० चौ.मी. क्षेत्राहून अधिक असल्यास त्यालगतच्या फुटकळ भूखंडाचे वितरण करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. सदरहू परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०५३०१७५९२८०८०९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bharose M U

Digitally signed by Bharose M U
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f3abf3ab8b16dfec487f18ce64d6b0ab8e38d8925d44d15f7dbd61babb4ae6df, serialNumber=8b015b0d7afaa0db7c0603c5c954e6816492dbb5f94ab286da7f224853a4eebf, cn=Bharose M U
Date: 2019.05.30 18:06:12 +05'30'

**( मुं.उ.भरोसे )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रत :-**

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
२) मा. मंत्री, गृहनिर्माण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -४०००३२
३) मा.मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
४) मा.राज्यमंत्री, गृहनिर्माण, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
५) मा.राज्यमंत्री, नगर विकास, गृह (शहरे), विधी व न्याय, संसदीय कार्य, कौशल्य विकास आणि उद्योजकता, माजी सैनिकांचे कल्याण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
६) मा.अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
७) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
८) सर्व मुख्य अधिकारी, मुंबई/कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
९) मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
१०) मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
११) गृहनिर्माण विभागातील सर्व उप सचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी.
१२) निवडनस्ती, गृनिभू कार्यासन, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

*******